EAV/ICD/2022-23/93
14th July, 2022

(9)

# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/93
गोपनीय
व्यवस्थापन परिषद

क्र.२/२०२२-२३

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील ४ जुलै, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची दुसरी सभा सोमवार **दिनांक ४ जुलै, २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता** आभासी पध्दतीने आयोजित करण्यात आली.

**स्वागत :-** सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु.क्र. | मा. सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य | उपस्थित |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य | अनुपस्थित |
| ४. | प्रा. राजेश खरात | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य | अनुपस्थित |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य | उपस्थित |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य | उपस्थित |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य | अनुपस्थित |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य | उपस्थित |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य | उपस्थित |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य | अनुपस्थित |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य | उपस्थित |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य | उपस्थित |
| १४. | डॉ. बी.एन. जगताप | सदस्य | अनुपस्थित |
| १५. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| १६. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १७. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १८. | श्री. शिवराम गर्जे | सदस्य | अनुपस्थित |
| १९. | डॉ. विनोद पाटील (संचालक,प. व मु. मं.) (प्र.कुलसचिव) | सदस्य सचिव /निमंत्रित | उपस्थित |
| २०. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |

➢ **अनुपस्थिती :-** डॉ. अनुराधा मजुमदार आणि डॉ. वैभव नरवडे यांनी त्यांची अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली :-**

**श्री. कृष्णकुमार कुन्नथ**

हिंदी चित्रपटातील प्रसिध्द गायक के. के. उर्फे कृष्णकुमार कुन्नथ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ३१ मे २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५३ वर्षाचे होते.

**डॉ. श्रीनिवासाचारी राजप्पा**

ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या ऑरगॅनिक सिंथेसिस विभागाचे प्रमुख डॉ. श्रीनिवासाचारी राजप्पा यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०१ जुन २०२२ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ८८ वर्षाचे होते.

**श्री. प्रदीप भिडे**

ज्येष्ठ वृत्तनिवेदक श्री. प्रदीप भिडे यांचे दीर्घ आजाराने दिनांक ०७ जुन २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षाचे होते.

**डॉ. रामचंद्र दत्तात्रय लेले**

अणुशास्त्राचा वैद्यकशास्त्र आणि उपचार पध्दतीतील (न्यूक्लिअर मेडिसिन) वापराचे जनक पद्मभूषण डॉ. रामचंद्र दत्तात्रय लेले यांचे दीर्घ आजाराने दिनांक २५ जुन २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४वर्षाचे होते.

**श्री. पालनजी मिस्त्री**

शापूरजी पालनजी उद्योग समूहाचे प्रमुख श्रीपालनजी मिस्त्री यांचे दीर्घ आजाराने दिनांक २८ जुन २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षाचे होते.

**श्रीमती. स्वप्ना घोष**

डॉ. अनुराधा मजुमदार यांच्या मातोश्रींचे दिनांक १ जुलै, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७८ वर्षांच्या होत्या.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| ब क्र. १ | १९ मे, २०२२ आणि २५ मे, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | १९ मे, २०२२ आणि २५ मे, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.<br><br>**<u>२५ मे, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे बाब क. १०</u>**<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार सन २०२२ मध्ये होणाऱ्या विविध प्राधिकरणांच्या निवडणूकीकरीता संगणकीय सॉफ्टवेअर घेण्यासंदर्भात मान्यता देण्यात आली. तसेच पुर्ननोंदणीसाठी २०/- रुपये शुल्क व नविन नोंदणीसाठी ४०/- रुपये शुल्क घेण्यासाठी मंजूरी देण्यात आली. विविध प्राधिकरणांच्या निवडणूकीसाठी सल्लागार समिती नेमण्याचे अधिकार मा. प्र-कुलगुरुंना देण्यात आले.<br><br>**च्या ऐवजी हे वाचावे.**<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार सन २०२२ मध्ये होणाऱ्या विविध प्राधिकरणांच्या निवडणूकीकरीता संगणकीय सॉफ्टवेअर घेण्यासंदर्भात मान्यता देण्यात आली. तसेच पुर्ननोंदणीसाठी २०/- रुपये शुल्क व नविन नोंदणीसाठी २०/- रुपये शुल्क घेण्यासाठी मंजूरी देण्यात आली. विविध प्राधिकरणांच्या निवडणूकीसाठी सल्लागार समिती नेमण्याचे अधिकार मा. प्र-कुलगुरुंना देण्यात आले. | |
| बाब क्र. २ | व्यवस्थापन परिषद दि. १८ सप्टेंबर, २०१९ आणि २४ जूलै, २०२० चा कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर . | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषद दि. १८ सप्टेंबर, २०१९ आणि २४ जूलै, २०२० चा कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीच्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या ३२ तक्रारींचे आदेश व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत माहिती करिता सादर. | तक्रार निवारण कक्ष |
| ठराव | अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीच्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या ३२ तक्रारींचे आदेशाची नोंद घेण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ४ | विद्यापीठातील विविध विभाग/ संस्था येथे कार्यरत असलेल्या (शासनमान्य/ स्वयंअर्थसहाय्यीत) शिक्षकांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी गठीत केलेल्या छाननी व मुल्यमापन/ निवड समितीच्या अहवालाबाबत. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | विद्यापीठातील विविध विभाग/ संस्था येथे कार्यरत असलेल्या (शासनमान्य/ स्वयंअर्थसहाय्यीत) शिक्षकांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी गठीत केलेल्या छाननी व मुल्यमापन/ निवड समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ५ | Report of the Committee constituted to enquire in to matter of various complaints received from the Head, University Department of Physics (Autonomous) against Dr. Milind Rundhe, Assistant Professor, University Department of Physics. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | Report of the Committee constituted to enquire in to matter of various complaints received from the Head, University Department of Physics (Autonomous) against Dr. Milind Rundhe, Assistant Professor, University Department of Physics Be accepted and as per committee export take necessary disciplinary action. | |
| बाब क्र. ६ | वर्ष २०२२ ची पहिली पेट जून २०२२ मध्ये किंवा तद्नंतर घेण्याचे योजिले आहे. तरीही सदर पेट ही डिसेंबर २०२१ च्या पध्दतीनेच Splashgain Technologies Pvt Ltd. च्या Technical assistance ने डिसेंबर २०२१ च्या Term & Conditions नुसार घेण्याचे व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे. | संशोधन प्रशासन आणि विस्तार विभाग |
| ठराव | युजीसी २०१६ च्या नियमावलीनुसार पी.एच्.डी. प्रवेश पूर्व परीक्षा २०२२ (PET) एकलव्य या कंपनीमार्फत घेण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ७ | प्रविणकुमार पवार, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०२० रोजीचे पत्र प्राप्त झाले. सदर पत्रात सर्वश्री शरद रणपिसे व इतर विधानपरिषद सदस्य यांच्या विधानसभा सदस्य यांच्या तारांकित प्रश्न क्र. १६० "राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाविरूध्द विद्यापीठाकडून कारवाई करण्याबाबत'' या तारांकित प्रश्नाला अनुसरून झालेल्या चर्चेमध्ये मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी ज्या महाविद्यालयांमध्ये आवश्यक सुविधा नाही त्या महाविद्यालयांवर काय कार्यवाही करणार असा प्रश्न विचारला असता विद्यापीठाने येणाऱ्या विद्यापरिषदेपुढे सदर बाब ठेवण्यात येईल असे प्रतिपादन केले. २८ महाविद्यालयांचा खुलासा व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी सादर. | महाविद्यालय संलग्नता आणि विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | २८ महाविद्यालयांचा खुलाश्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता देण्यात आली. सदर कंपालंस रिपोर्ट तपासण्यासाठी नविन समिती समोर ठेवण्यात यावी. नविन समितीने रिपोर्ट तपासून याबाबत अहवाल परत व्यवस्थापन परिषदे समोर सादर करावा. | |
| बाब क्र. ८ | प्रोफेसर ॲण्ड हेड, डिपार्टमेंट ऑफ बायोकेमेस्ट्री, टी. एन. मेडिकल कॉलेज ॲण्ड बी. वाय. एल. नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई-४०० ००८ या महाविद्यालयाने एम. एस्सी. (बायो-केमेस्ट्री) बाय पेपर हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बंद करण्यासाठीचा स्थानिक चौकशी समितीचा अहवाल. | महाविद्यालय संलग्नता आणि विकास विभाग |
| ठराव | प्रोफेसर ॲण्ड हेड, डिपार्टमेंट ऑफ बायोकेमेस्ट्री, टी. एन. मेडिकल कॉलेज ॲण्ड बी. वाय. एल. नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई-००८ या महाविद्यालयाने एम. एस्सी. (बायो-केमेस्ट्री) बाय पेपर हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बंद करण्यासाठीचा स्थानिक चौकशी समितीचा अहवालास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ९ | प्रोफेसर ॲण्ड हेड, डिपार्टमेंट ऑफ बायोकेमेस्ट्री, लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज ॲण्ड जनरल हॉस्पिटल, सायन, मुंबई-४०० ०२२ या महाविद्यालयाने एम. एस्सी. (बायो-केमेस्ट्री) बाय पेपर हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून बंद करण्यासाठीचा स्थानिक चौकशी समितीचा अहवाल. | महाविद्यालय संलग्नता आणि विकास विभाग |
| ठराव | प्रोफेसर ॲण्ड हेड, डिपार्टमेंट ऑफ बायोकेमेस्ट्री, लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज ॲण्ड जनरल हॉस्पिटल, सायन, मुंबई-४०० ०२२ या महाविद्यालयाने एम. एस्सी. (बायो-केमेस्ट्री) बाय पेपर हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून बंद करण्यासाठीचा स्थानिक चौकशी समितीचा अहवालास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. १० | पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी मुंबई विद्यापीठ फोर्ट कॅम्ससाठी मार्गदर्शित हेरिटेज टूर आयोजित करण्यास परवानगी देण्याच्या विनंतीबाबत. | सुरक्षा विभाग |
| ठराव | मा. कुलगुरूंनी सदर बाब संबंधित महाराष्ट्र टाईम्सच्या उपक्रमाची व्यवस्थापन परिषदेला माहिती दिली. महाराष्ट्र टाईम्सने त्याच्या वर्धापदिना निमित्त एक उपक्रम हाती घेतला होता. त्या दिवशी त्यांनी महापालिकेच्या इमारतीचा इतिहास, संपूर्ण मुंबईचा इतिहास लोकांना सांगितला. त्याप्रमाणे मुंबई विद्यापीठाचा इतिहास, राजाबाई टॉवरचा इतिहास लोकांना नक्कीच आवडेल. पर्यटन क्षेत्रातून लोकांना काही चार्ज फिस घेत असतील तर त्यांचा मोबदला हि विद्यापीठाला मिळेल. | |

| | | |
|---|---|---|
| | पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी मुंबई विद्यापीठ फोर्ट कॅम्ससाठी मार्गदर्शित हेरिटेज टूर आयोजित करण्यास परवानगी देण्याच्या विनंतीला मान्यता देण्यात आली. याबाबत पुढील प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याचे आदेश मा. कुलगुरूंनी दिले. | |
| बाब क्र. ११ | To rent out Shaheed Bhagat Singh Godown located at out Shaheed Bhagat Singh Road, Fort, Mumbai - 400 023. | पायाभूत सुविधा नियोजन, अंमलबजावणी व देखभाल विभाग |
| ठराव | शहीद भगत सिंग गोडाउन भाडे तत्वावर देण्यास मान्यता देण्यात आली व याबाबत समिती नेमूण भाडे, अटी, शर्ती व निकष या करण्याबाबत व समिती अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावा. सदर समिती तात्काळ नेमण्याबाबत मा. कुलगुरूंनी आदेश दिले. | |
| बाब क्र. १२ | मुंबई विद्यापीठातील विविध अनुदानित/ विनाअनुदानित विभाग/केंद्र/ संस्था येथील प्राध्यापक/ संचालक यांच्या निवडीकरिता निवड समितीवर माननीय कुलगुरूंना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराद्वारे नामनिर्देशित केलेल्या विषय तज्ञ/ सदस्यांचे नावे व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील विविध अनुदानित/ विनाअनुदानित विभाग/केंद्र/ संस्था येथील प्राध्यापक/ संचालक यांच्या निवडीकरिता निवड समितीवर माननीय कुलगुरूंना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराद्वारे नामनिर्देशित केलेल्या विषय तज्ञ/ सदस्यांचे नावांची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क्र. १३ | Permission to approve MOU between University of Mumbai, Rotary India Literacy Mission & Rotary International District 3141. | राष्ट्रीय सेवा योजना |
| ठराव | Permission to approve MOU between University of Mumbai, Rotary India Literacy Mission & Rotary International District Be accepted | |
| बाब क्र. १४ | विद्यानगरी परिसरातील Diamond AWWA Hostel इमारतीचा एक मजला वाढविण्यास ना–हरकत प्रमाणपत्र निर्गमित करणेबाबत. | विद्यानगरी प्रशासकिय विभाग |
| ठराव | विद्यानगरी परिसरातील Diamond AWWA Hostel इमारतीचा एक मजला वाढविण्यास ना–हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. सदर वसतिगृह माजी सैनिकांच्या मुलांसाठी आहे. परंतु इतर विद्यार्थ्यांनसाठी देखील तिथे आरक्षण असोव असे प्रदिप सावंत यांनी सुचविले. मा. कुलगुरू यांनी मा. प्र–कुलगुरू यांना व्यवस्थापन परिषदेच्या काही सदस्यांना सोबत प्रत्यक्ष भेट देण्यास सांगितले. प्रत्यक्ष भेटीनंतर ना–हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १५ | दमानी परिवार फाउंडेशनतर्फे मुंबई विद्यापीठ विद्यानगरी परिसरात विद्यार्थ्यांकरिता व शैक्षणिक अभ्यासक्रमास अनुसरून आवश्यक प्रकल्पाचे स्वखर्चाने बांधकाम करून देण्याच्या प्रस्तावाबाबत. | विद्यानगरी प्रशासकिय विभाग |
| ठराव | दमानी परिवार फाउंडेशनतर्फे मुंबई विद्यापीठ विद्यानगरी परिसरात विद्यार्थ्यांकरिता व शैक्षणिक अभ्यासक्रमास अनुसरून आवश्यक प्रकल्पाचे स्वखर्चाने बांधकाम करून देण्याच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.<br>ॲड. नील हेळेकर हयांनी सदर प्रपोजलसाठी सजेशन दिले की नविन शैक्षणिक इमारत बांधताना प्रपोजल हे हायर साइड असले पाहिजे. बिल्डिंग, इंटेरियर व अन्य बाबी हया उच्च प्रतिच्या असल्या पाहिजे. जेणे करून नंतर इमारतीच्या मेंटनेसचा खर्च कमी होतो. मा. कुलगुरूंनी सदर सुचना मान्य केली. तसेच स्कुल ऑफ इकोनॉमिक्स व सेंटर फॉर एक्सलेंस इन मरीन स्टडीज साठी प्रोफेशनल लोकांकडून प्रपोजल सादर करण्याचे आदेश दिले. | |
| बाब क्र. १६ | Approval for the acceptance of donation of Rs. 75 Lakhs from TATA investment Corporation Limited, Mumbai. | ज्ञान स्त्रोत्र केंद्र जवाहरलाल नेहरु ग्रंथालय |
| ठराव | It was resolved to accept the donation of Rs. 75 Lakhs from TATA investment Corporation Limited, Mumbai. | |

माननीय प्र–कुलगुरूंनी राजीव गांधी सायन्स आणि टेक्नोलॉजी, गर्व्हमेंट ऑफ महाराष्ट्र सरकारकडून प्राप्त पत्रानुसार मुंबई विद्यापीठासाठी ५० लाख प्राप्त झाल्याबद्दल माहिती दिली. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर जिल्हातील महाविद्यालयांना त्यांच्या भागातील संसाधनेवरील संशोधनासाठी जास्तीत जास्त पाच लाख रूपये मिळणार असल्याबद्दल माहिती दिली.

तसेच मिनिस्टरी ऑफ एज्युकेशन, तर्फे मुंबई विद्यापीठासाठी 'समर्थ'– आयटी सिस्टिम काही मॉडयुलवर काम करण्यासाठी मिळणार असल्याबद्दल विस्तृत माहिती दिली. सदर सिस्टिम विद्यापीठासाठी मोफत आहे.

ॲड. नील हेळेकर यांनी 'मॅनेजमेंट कॉन्सिल कोर कमिटी' बद्दल व्यवस्थापन परिषदेला माहिती दिली कि संबंधित कमिटीने मुंबई विद्यापीठाच्या कर्मचाऱ्या संबंधित विविध तक्रारी बद्दल चार/पाच बैठका घेतल्या आहेत. सदर बैठकांमध्ये विविध संघटनाने पदधिकारी सुध्दा येऊन गेलेत. संबंधित तक्रारी बद्दल लवकरच योग्य तो निर्णय कमिटी लवकरच घेईल व रिपोर्ट व्यवस्थापन परिषदे समोर सादर करण्यात येईल.

मा. कुलगुरूंनी अनुसूचित जनजाती आयोग, दिल्ली येथील मार्गदर्शन शिबिर बद्‌ल व्यवस्थापन परिषदेला माहिती दिली. अनुसूचित जनजाती प्रवर्गातील लोकांसाठी विद्यापीठात 'आझादी का अमृत महोत्सव' कार्यक्रम घेण्याबाबत मार्गदर्शन केले. ज्यामुळे अनुसूचित जनजाती प्रवर्गाच्या भारताच्या स्वातंत्र्य लढयातील सहयोग इतरांनाही अवगत होईल व त्यांच्या योगदानाबद्‌दल इतरांनाही माहिती मिळेल.

12/7/22
सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

प्र. कुलसचिव

प्र-कुलगुरू

कुलगुरू